म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा. क्र. ५१९

# झुक झुक इंजिनवाळे



BVBK-0400519

# झुक् झुक्
# इंजिन बोले

: लेखिका :

सौ. सुहासिनी वाझकर
एम्. ए.

विभाग.
५१९ दिनांक .......
.......

BVBK-0400519

मूल्य साठ पैसे

# प्रकाशनापूर्वी

'झुक् झुक् इंजिन बोले' हा माझा दुसरा कवितासंग्रह माझ्या बालवाचकांपुढे ठेवताना मला फार आनंद होत आहे. माझा पहिला बालगीतांचा संग्रह प्रकाशित करण्याची संधी श्री. ल. गो. परांजपे यांनी दिली. आतासुद्धा हे दुसरे बालगीतांचे पुस्तक त्यांच्याच सहकार्याने काढीत आहे. श्री. ल. गो. परांजपे यांचे मी त्याबद्दल आभार मानते. मुखपृष्ठाची त्यांची कल्पना माझ्या बालवाचकांना फार आवडेल, अशी अपेक्षा आहे. असो. ज्याच्या कृपेने मला हे पुस्तक लिहिण्याची स्फूर्ती झाली; त्या श्रीकृष्णाला माझे प्रथम वंदन !

श्रीकांत लॉज,
हिंदु कॉलनी, १ ली गल्ली,
दादर मुंबई १४.

—सौ. सुहासिनी कृ. वाझकर,
एम्. ए.

ति. सौ. दादी
हिच्या स्मृतीस
अर्पण

प्रथमावृत्ती : दीपावली ३ नोव्हेंबर १९६७
द्वितीयावृत्ती : गांधीजयंती २ ऑक्टोबर १९६९
तृतीयावृत्ती : गांधीजयंती २ ऑक्टोबर १९७२

मुद्रक : स. शं. आजगांवकर, मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१, स. व. प. रोड, मुंबई ४.
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन, ३० सी, खोताची वाडी, मुंबई ४.

# झुक झुक इंजिन बोले

झुक झुक झुक झुक इंजिन बोले ।
लवकर लवकर गावी निघाले ॥

पों पों पों पों मोटर बोले ।
रस्त्यावरूनी ऐटीत चाले ॥

फट फट फट रिक्षा येते ।
दोनच माणसे घेईन सांगते ॥

ठण ठण ठण टांगा आला ।
जणू बोलतो व्हा बाजूला ॥


खट खट खट खटारा बोले ।
बैल माझे किती चांगले ॥

धड धड धड बस येते ।
रांगा लावा असे सांगते ॥

घर घर घर विमान बोले ।
चोवीस तासांत लंडन आले ॥

आपण परी ते पायी जातो ।
घाई नाही आम्हां सांगतो ॥

# सशाची फजिती



पिटुकला ससा
कापूस जसा
हत्तीला पाहून बोलतो कसा
हत्तीभाऊ हत्तीभाऊ दूर बसा !
शी ! शी ! शी !
किती हो तुम्ही काळे काळे ?
काय तुमचे अंग घाण घाण सगळे !
अंगाला साबण
लावता का आपण ?

मी बघा कसा !
गोरा गोरा पान,
अंग माझे छान !

नदीवर जातो, आंघोळ करतो,
गोरा गोरा पान होऊन येतो !”

“ बरं तर ससेभाऊ
चला आपण जाऊ !
दाखवा पाहू वाट
नि नदीचा काठ !”
दोघे मिळून निघाले ।
नदीकाठी आले ।
चिखलाचे पाणी,

सोंडेत घेऊन हत्तीने फेकले ।
ससोबा सगळे भिजून गेले ।
काळे काळे अंग सारे झाले ।
दूर रानात पळून गेले ॥

# वाढदिवस

काय सांगू बाई । आज आहे घाई
आज किनई । आज किनई
सांगु का जंमत । आहे मोठी गंमत
बेबीच्या बाहुलीचा । थाटात करायचा
वाढदिवस आहे मौजेचा ॥

नवा नवा झगा । नवे नवे बूट
घालून बसली । काय पण ऐट
तिला पहायला । बेबीच्या मैत्रिणी
बाहुलीच्या पुढे । ताटभर खाऊ
तिला नको तर । आपणच घेऊ ॥

# गुरुजी

बोकडाने काढली संगीत शाळा ।
दाढीवाला गवई ऐटीत बसला ॥

घेऊन आला मोठा फळा ।
मुलांची नावे लिहू लागला ॥

गाढवाने लावला पहिला नंबर ।
घोडा येऊनी बसला नंतर ॥

वाघ-सिंहही आले मागुनी ।
म्हणती "नाव द्या हो लिहुनी" ॥

ऐकुनी डरकाळी वाघाची ।
धांदल झाली हो गुरुजींची ॥

कुठले गाणे कुठली शाळा ।
आधी इथुनी पळा हो पळा ।

गुरुजी गेले पार भिऊनि ।
लवकर लवकर जाती पळुनि ॥

★

# पाऊस



आला पाऊस आला ।
अंगणात या जाऊ चला ॥धृ०॥

टप टप टप टप पाणी पडले ।
आकाशातून मोती गळले ॥

झरझर झरझर जाऊनी तिकडे ।
आपण सगळे वेचू चला ॥ १ ॥

काळे कुट्ट आकाश झाले ।
दाटीदाटीने ढगही जमले ॥

कड् कड् कड् कड् वीज चमकली ।
साथ तिला आजि देऊ चला ॥२॥

डराँव डराँव हे बेडूक आले ।
पाण्यामध्ये खेळू लागले ॥

त्यांच्यासंगे चिखलामधुनि ।
उड्या मारूनी खेळू चला ॥३॥

नकोच छत्री आम्हाला ती ।
पाणी पडते डोक्यावरती ॥

पावसातुनी भिजावयाला ।
आवडते हो आम्हांला ॥४॥



# पिटुकला उंदीर

पिटुकला उंदीर आईला सांगतो ।
" बिळाच्या बाहेर जाऊन येतो " ॥

आई बोलली, " नको रे बाळा ।
लबाड बोका खाईल तुला " ॥

" बोकोबापासून दूर जाईन ।
लवकर लवकर पळून येईन " ॥

पिटुकला उंदीर बाहेर आला ।
हळुच दारात लपून बसला ॥

बोकोबा आले धावत धावत ।
पिटुकला उंदीर गेला पळत ॥

घाबरून लवकर बिळात शिरला ।
आई जवळ जाऊन बसला ॥

" आई गऽआई काय सांगु तुला ।
फार फार भीती वाटते मला " ॥

★

वनात जमले सखेसोबती ।
करीत होते गंमती-जंमती ॥
पोपट बोले मान हालवुनि ।
"दावू का मी नकला करूनि ?" ॥
कुहू कुहू कोकीळ बोलला ।
"गाऊ का मी वसंत आला ?" ॥
पसरी अपुला छान पिसारा ।
"नाचू का मी ?" मोर बोलला ॥
आला कोंबडा उडवीत मान ।
बोले, "मी तर घेतो तान" ॥
छोटी चिमणी बैसे दूर ।
म्हणे, "देऊ की चिव चिव सूर ?" ॥
सांगे काऊ डोळा फिरवीत ।
"दावू का मी करून कसरत ?" ॥
हूं हूं बोलत कबुतर आले ।
"आहे मजला पसंत सगळे" ॥

★



मनुताईची छोटीशी शाळा ।
फीसाठी एकेक लोण्याचा गोळा ।

मांजरांची पिल्ले जमली सारी ।
म्यँव म्यँव करिती गडबड भारी ॥

छत्री घेऊन ।
साडी नेसून ।

मनुताई आली ।
खुर्चीत बसली ।

हातातली छडी आपटून बोलली ।

झू झू झू ।
बोलायचं नाही कुणी बसा खाली ॥

पिटुकला उंदीर ।
दारात आला ।
चू चू गाणे ।
गाऊ लागला ॥

सारी मुले पाहू लागली ।
आणि एकच गडबड झाली ॥

मनुताई धावली घेऊन छडी ।
उंदराने मारली बिळात दडी

तशीच तिकडून पळत आली ।
मुले तर सारी निघून गेली ॥
लोण्याचे गोळे गेली बघायला ।
एकही गोळा नाही मिळाला ॥

☆

एके दिवशी विचार करुनि
चिंगी बोलली आईला।

" रोज रोज मी तुझे ऐकते
आज व्हायचे आई मला ॥

माझे सगळे ऐकुनी घेई।
मी सांगेनही तेची करी ॥

दूध आजि घे पिऊनी तूही।
चहाच घेईन तुझा मीही ॥

पाटी-दप्तर घेऊनी तूची।
शाळेला जा आज गडे ॥

घेऊन येई सायंकाळी।
बाई देतील तेच धडे ॥

ऐकुनि सारे बाबा आले।
हसुनी वदले चिंगीला ॥

"तसे करूया तुझ्या ऐवजी ।
जाईल आई शाळेला ॥

जेवण करूनी जेवायाला ।
कोण ग देईल आज मला ? ॥

छानछानसे आईसारखे ।
करायास का ये तुजला ?" ॥

चिंगी पडली विचारात मग ।
जमेल कैसे हे मजला ? ॥

आई व्हायचे सोपे नाही ।
हळूच वदली आईला ॥

" आई आई नको तसे ग ।
काम तुझे ते तूची करी ॥

तूची आई सदा रहावी ।
चिंगी आहे मीच बरी " ॥

★

## अजब मेजवानी

माकडरावाचे लगीन झाले ।
मौज कराया सारे जमले ॥

गाढव गवई गान गातसे ।
अस्वल नाचुनी ताल धरितसे ॥

हत्ती येतसे तो डौलात ।
टाकी पाऊले झोकात ॥

उंच उंच ती मान फिरवुनी ।
उंटही दावी ऐट करूनी ॥

वाघ-सिंह ते बडे पाहुणे ।
पुढचे ऐकत बसले गाणे ॥

वरात नेऊ हत्तीवरूनी ।
असेच ठरले एकमतानी ॥

अपमान उंटाचाच झाला ।
निघून जातो असे बोलला ॥

वाद जाहला सुरू तयांचा ।
होई लढाई वेळ कशाचा ॥

नवरानवरी पळुनी गेली ।
सारी सारी गडबड झाली ॥

पशू किती ते ठारच होती ।
वाघ सिंह परि ताव मारिती ॥

# चांदोबा



आई आई चांदोबाचे
  घर आहे ना आभाळात ? ।

धावत धावत येतो तिथुनी
  ढगामागुनी का डौलात ॥

जणू हा राजा ऐटीत चाले
  राणी याची कुठे असे ? ।

ताऱ्यांना जमवुनी हा आई
  खेळ कोणता खेळतसे ? ॥

झाडाआडुनी काय पाहतो
एकसारखा मलाच का ?।
मधेच लपतो ढगाआड का
मला भिऊनी जणूच हा ॥

रोज रोज हा बदलत जातो
पुनवेला हा गोल कसा ?।
देवाजीच्या घरी लाविला
सुंदर मोठा दीप जसा ॥

लखलख चमके आभाळामधी
आवडतो हा भारी मला।
बघत रहावे वाटे आई
एकसारखेची यालो ॥



# निळोबा



एक होते कोल्होबा ।
त्यांचे नाव निळोबा ॥

निळोबा गेले तानात ।
चालले आपल्या रानात ॥

भूक लागली फार फार ।
द्राक्षे दिसली हिरवीगार ॥

खाऊ तरी किती किती ।
परी द्राक्षे होती उंचावरती ॥

उड्या मारुनी पाहिले ।
हाती काहीच न आले ॥


थकुनी जाती ।
कसे बोलती ॥

नकोच मजला द्राक्षे ती ।
आंबट आंबट सारी असती ॥

शोधित जाईन वनांतरी ।
मधुर दुसरी कुठे तरी ॥

विषय

# काय सांगता



चिव चिव चिव बाई ।
काय सांगता चिऊताई ? ॥

घरी जायची झाली घाई ।
लवकर दाणे टीपा हो बाई ॥

काव काव, काव काव ।
काय सांगता कावळेराव ॥

पाहुणा आता येणार तर ।
पाठवून द्या लवकर लवकर ।

म्यँव म्यँव म्यँव बाई ।
काय सांगता मनुताई ॥

दूध आता पाहिजे का ? ।
चोरून चोरून पिऊ नका ॥

भू भू भू भू ।
काय सांगता मोत्याभाऊ ॥

रात्री जागून थकलात का ।
शिळी भाकरी घेऊन खा ॥



## मला वाटते

वाटे मज की पोपट होऊ
हिरवा हिरवा गार ।
रानामधुनी फिरून खावी
फळे गोड ती फार ॥
वाटे मजला होऊ सुंदर
निळा निळा मोर ।
नाचावे फुलवून पिसारा
छान झोकदार ॥
मला वाटते होऊन जावे
फुलपाखरू छान ।
फुलांफुलांवरील मध चाखावा
गाऊनिया गान ॥
की होऊनी कोकीळ जावे
दूर कुठे उपवनी ।
झाडावरती बसून गावी
गोड गोड गाणी ॥



म. सं. ग्रं, ठाणे, बालकुमार शाखा.
विषय
BVBK-0400519